# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:06.12.2024** **वारःशुक्रवार**

---

1. नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं अष्टलक्ष्मी महोत्सवाचं पंतप्रधानाच्या हस्ते आज उद्घाटन
2. महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री म्हणून भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी
3. रिझर्व बँक आज आपलं द्वैमासिक पतधोरण जाहीर करणार
4. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादरमध्ये चैत्यभूमीवर अनुयायांची गर्दी आणि
5. भारत ऑस्ट्रेलिया दरम्यान दूसरा क्रिकेट कसोटी सामना आज ॲडलेड इथं सुरू होणार

**अष्टलक्ष्मी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं अष्टलक्ष्मी महोत्सवाचं उद्घाटन करणार आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात ईशान्येकडील आठही राज्यांची संस्कृती, वस्त्रोद्योग, कलाकुसर, पर्यटनाच्या संधी आणि वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांच्या प्रदर्शनाचा समावेश असेल. या महोत्सवाची प्रेरणा एकत्रितपणे अष्टलक्ष्मी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ईशान्येकडील आठ राज्यांमधून आली आहे; त्यात अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, आणि त्रिपुरा या राज्यांचा समावेश आहे. महोत्सवादरम्यान, 250 हून अधिक कारागीरांद्वारे प्रदर्शनात GI-टॅग केलेल्या 34 वस्तूंसह वैशिष्ट्यपूर्ण हस्तकला, हातमाग, आणि कृषी उत्पादनं यांचा समावेश असेल. या क्षेत्रातील 320 शेतकरी तसंच कारागिरांची उत्पादनं आणि कला यांच्या प्रदर्शनाचा समावेश असलेला ग्रामीण हाट बाजार हे या महोत्सवाचं सर्वात मोठं आकर्षण असेल.

**राष्ट्रपती**

'न्यायव्यवस्थेनं शिक्षेपेक्षा न्याय देण्यावर भर द्यावा', असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. भुवनेश्वर इथं नवीन न्यायालय संकुलाचं उद्घाटन काल राष्ट्रपतींच्या हस्ते झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. गरीब लोकांना अनावश्यक त्रासदायक ठरणारी, न्यायापासून वंचित ठेवणारी आणि खटले सातत्यानं पुढे ढकलणारी स्थगन संस्कृती थांबविण्याचं आवाहन त्यांनी कायदेतज्ज्ञांना केलं. 'भारतीय न्याय संहितेनं देशातील वसाहतवादी न्यायव्यवस्था संपुष्टात आणली असून त्यामुळे भारतीय दंड संहितेचा अंत झाला आहे. जनतेला पोलिस आणि न्यायालयांविषयी निर्भय बनविणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे', असं त्या म्हणाल्या. सर्वसामान्यांच्या हितासाठी न्यायालयीन आदेश स्थानिक भाषांमध्ये देण्याचे आणि प्रसिद्ध करण्याचं आवाहनही राष्ट्रपतींनी केलं. मंगळवारपासून ओडिशाच्या पाच दिवसांच्या दौऱ्यावर असलेल्या राष्ट्रपती आज मयूरभंज जिल्ह्यातील उपरबेडा या आपल्या मूळ गावी जाणार आहेत आणि मयूरभंजमधील अनेक कार्यक्रमांनाही हजेरी लावणार आहेत.

**संसद गदारोळ**

भाजपा सदस्य निशिकांत दुबे यांनी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांवर केलेले आरोप तसंच उत्तर प्रदेशातल्या संभल इथं झालेला हिंसाचार या मुद्द्यांवरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या गदारोळामुळं लोकसभेचं कामकाज काल दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. एका फ्रेंच प्रकाशनानं प्रसिद्ध केलेल्या बातमीचा उल्लेख करत अशा शक्ती भारतीय संसद आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत अडथळे आणण्याचा प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच प्रियंका गांधी, राहुल गांधी समाजमाध्यमांवरच्या हँडलवर हे वृत्त प्रसिद्ध करत आहेत, असं दुबे म्हणाले. त्यानंतर काँग्रेस, द्रमुक आणि इतर सदस्यांनी गदारोळ केल्यामुळं आधी दुपारी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दुपारी 3 जेपर्यंत कामकाज तहकूब करावं लागलं. तीन नंतर कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वे सुधारणा विधेयकावर उत्तर देण्याचा प्रयत्न केला पण गदारोळ कायम राहिल्यामुळं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. राज्यसभेत काल भारतीय वायुयान विधेयक 2024 संमत झाल्यानं या विधेयकाला संसदेची मंजुरी मिळाली आहे. लोकसभेची या विधेयकाला यापूर्वी पावसाळी अधिवेशनातच मंजुरी मिळाली होती. या विधेयकात विमानाचं उत्पादन, देखरेख, दुरुस्ती, आयात तसंच अपघाताची चौकशी याबद्दलच्या नियमांचा समावेश आहे.

**रिझर्व्हबँक**

भारतीय रिझर्व्ह बँक आपलं द्वैमासिक पतधोरण आज जाहीर करणार आहे. देशातील वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या नेतृत्वाखाली पत धोरण समितीची आढावा बैठक बुधवारपासून सुरू होती. अर्थतज्ज्ञांच्या मते रिझर्व्ह बँक रेपो रेट मध्ये काहीही बदल न करता ते जैसे थे ठेवण्याची अधिक शक्यता आहे. मात्र, सी आर आर अर्थात कॅश रिझर्व्ह रेशो मध्ये बदल केले जाण्याची शक्यता आहे. बँकेनं फेब्रुवारी 2023 पासून रेपो रेट 6 पूर्णांक 5 दशांश टक्के कायम ठेवला आहे.

**शपथविधी सोहळा**

महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री म्हणून भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी काल शपथ घेतली. मुंबईत आझाद मैदानात झालेल्या समारंभात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी फडणवीस यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. याच समारंभात उपमुख्यमंत्री म्हणून शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनीही शपथ घेतली. शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विशेष उपस्थिती होती. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, निर्मला सीतारामन, शिवराजसिंह चौहान, जेपी नड्डा, रामदास आठवले, यांच्या बरोबरच अनेक राज्यांचे मुख्यमंत्री तसंच उद्योग, क्रीडा, चित्रपटसृष्टीसह इतर क्षेत्रातले मान्यवरही यावेळी उपस्थित होते. या शपथविधी सोहळ्यासाठी देशभरातून भाजपाचे अनेक नेते आणि पदाधिकारी तसंच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

**महापरिनिर्वाण दिन**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा आज 68 वा महापरिनिर्वाण दिन आहे. यानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी राज्यभरातून येणाऱ्या अनुयायांना सुविधा पुरवण्यासाठी मुंबई महापालिकेनं जय्यत तयारी केली आहे. पालिकेनं चैत्यभूमी परिसरात नियंत्रण कक्ष उभारला असून रुग्णवाहिका, आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, शौचालये अशा सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. महापरिनिर्वाणदिनानिमित्त महापालिकेच्या जनसंपर्क विभागानं बाबासाहेबांच्या जीवनपटावर आधारित छायाचित्र प्रदर्शनही भरवलं आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आज सकाळी चैत्यभूमीवर जाऊन बाबासाहेबांना अभिवादन केलं.

**अन्नचक्र**

केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सार्वजनिक वितरण प्रणाली अर्थात पीडीएस मधील पुरवठा साखळीची कार्यक्षमता वाढविण्याचं प्रमुख साधन म्हणून उपयुक्त ठरणारा 'अन्नचक्र' हा उपक्रम काल नवी दिल्ली इथं सुरू केला. याशिवाय राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यासाठी (स्कॅन) अर्थात सबसिडी क्लेम ॲप्लिकेशन नावाचं पोर्टलही काल सुरू करण्यात आलं. या अभिनव उपक्रमामुळे सार्वजनिक वितरण प्रणालीच्या अंमलबजावणीत पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व वाढेल, असं जोशी म्हणाले. सार्वजनिक वितरण प्रणालीचं पूर्णपणे आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने ही पावलं उचलण्यात आली आहेत.

**प्रोबा प्रक्षेपण**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोनं श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रावरून काल दुपारी प्रोबा-3 या उपग्रह वाहून नेणाऱ्या PSLV C 59 या प्रक्षेपकाचं यशस्वीरीत्या प्रक्षेपण केलं. युरोपीय अंतराळ संस्थेच्या प्रोबा-3 उपग्रहांना यशस्वीरीत्या कक्षेत स्थापित करण्यासाठी पीएसएलव्ही सी-59 चं प्रक्षेपण करण्यात आलं असल्याची माहिती इस्रोनं या

प्रक्षेपणानंतर एक्स या समाजमाध्यमावरून दिली आहे. पीएसएलव्ही सी-59 अंतराळात झेपावल्यानंतर 18 मिनिटांत त्याच्या निर्धारित कक्षेत पोहोचल्यानंतर त्यानं 545 किलो वजनाचे दोन उपग्रह पृथ्वीपासून 600 किलो मीटर अंतरावरच्या त्यांच्या निर्धारित कक्षेत स्थापित केले. प्रोबा3 ही युरोपियन अंतराळ संस्थेची महत्त्वाची मोहीम असून त्याअंतर्गत आणखी दोन उपग्रहही अंतराळात सोडण्यात आले आहेत.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावसकर करंडक कसोटी मालिकेतील दुसरा सामना आजपासून सुरू होत आहे. ॲडलेड इथल्या ओव्हल मैदानावर हा सामना गुलाबी चेंडूच्या वापरासह दिवस-रात्र खेळला जाणार आहे. यापूर्वी पर्थ इथं झालेला पहिला सामना जिंकून भारतानं या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. त्यामुळे या सामन्यातही आपलं वर्चस्व कायम राखण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल, तर यजमान संघ आपलं आव्हान कायम ठेवण्याच्या जिद्दीनं मैदानात उतरणार असल्यानं क्रिकेटप्रेमींची या सामन्याबद्दल उत्सुकता वाढली आहे. आज आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आल्यानं पहिल्या दिवशी खेळात पावसाचा व्यत्यय येण्याची शक्यता आहे.

**भारोत्तोलन-स्पर्धा**

बहारीनमधील मनामा इथं आजपासून जागतिक भारोत्तोलन स्पर्धा सुरू होत आहे. स्पर्धेमध्ये तीन भारतीय महिला खेळाडू सहभागी होणार असून पुरुष गटात यंदा भारताचं प्रतिनिधित्व असणार नाही. 2020 च्या टोकियो ऑलिंपिक मध्ये रौप्यपदकाची मानकरी ठरलेली मीराबाई चानू देखील या स्पर्धेला मुकणार आहे. ज्ञानेश्वरी यादव महिलांच्या 49 किलो गटात भारताचं प्रतिनिधित्व करेल. स्पर्धेमधील अ गटातील ती एकमेव भारतीय खेळाडू आहे.

**भूकंप**

अमेरिकेत उत्तर कॅलिफोर्नियामध्ये काल तीव्र भूकंपाचा धक्का बसला. रिखटर स्केलवर त्याची तीव्रता 7 नोंदवण्यात आली. अमेरिकेच्या जिओलॉजिकल सर्व्हेनं दिलेल्या माहितीनुसार उत्तर कॅलिफोर्नियामधील हम्बोल्ट काउंटीमधील फर्न्डेलच्या वायव्येला सुमारे 100 किलो मीटर अंतरावर हा भूकंप झाला. याबाबत अधिक तपाशीलाची प्रतीक्षा आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.